# नवोपक्रम

## शिर्षक : मिशन NTS ……. स्पर्धात्मक परीक्षा यशस्वीतेचा मार्ग



# माध्यमिक गट

# मिशन एनटीएस( राष्ट्रीयप्रज्ञाशोध ) ....... स्पर्धात्मक परीक्षा  यशस्वीतेचा मार्ग


**शिक्षकाचे नाव उमेश भाऊराव इंगळे**

**शाळेचे नाव महात्मा मुंगसाजी विद्यालय पुसद तालुका पुसद जिल्हा यवतमाळ**

**यु डायस नंबर 27141112222**


**उपक्रमाचा स्तर माध्यमिक (वर्ग१०वा)**

**उपक्रमाचा :25/8/20 ते 12/12/20**


**Mobile : 8275502066**

**Email: ingaleumesh55@gmail.com**

# अनुक्रमणिका


| अ क्र | तपशिल | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| 1 | प्रस्तावना | 1 |
| 2 | नवोपक्रमाची गरज व महत्त्व | 2 |
| 3 | उदिष्टे | 7 |
| 4 | नियोजन | 8 |
| 5 | यशस्विता | 16 |
| 6 | समारोप | 18 |
| 7 | नवोपक्रम फोटो | 21 |
| 8 | संदर्भ व परिशिष्टे | 25 |
| 9 | यूट्यूब लिंक्स | 30 |
| 10 | ऑनलाइन परीक्षा लिंक | 31 |

# प्रस्तावना

**शालेय विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधणे हेच खरे शिक्षणाचे उद्दिष्ट आहे केवळ अभ्यासक्रम शिकून उद्दिष्ट पूर्ण होणार नाही तर अभ्यासेत्तर उपक्रमावर भर देणे आवश्यक आहे. आजचा विद्यार्थी हा ज्ञानाचा भुकेला आहे आणि त्यासाठी ज्ञानाच्या कक्षा रुंदावणे ही शिक्षकाचे कर्तव्य आहे. यासाठी गुणवत्तापूर्णचे नियोजन करणे हे प्रत्येक शिक्षकाची जबाबदारी आहे. आपल्याला भरपूर पगार आहे आपण पगार इतके कार्य करतो का याचे आत्मपरीक्षण करणे देखील प्रत्येक शिक्षकाने आवश्यक आहे.हे तेव्हाच शक्य होईल जेव्हा तो मनातून काम स्वीकारेल आणि त्याच वेळी खऱ्या अर्थाने विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधला जाईल. मी विद्यार्थ्यांसाठी या लॉक डाऊन मध्ये काहीतरी करण्याच्या दृष्टीने पारंपरिक अध्यापन पद्धतीला फाटा देऊन अध्यापनात नाविन्यता आणण्याच्या दृष्टीने एक नवा उपक्रम राबविला. हे केल्याने देशाचे उज्ज्वल भवितव्य घडविण्यात आपला खारीचा वाटा आहे असे आत्मिक समाधान आपल्याला मिळेल आणि हे मिळून देण्याचे कार्य " मिशन एनटीएस ...... स्पर्धात्मक परीक्षा यशस्वीतेचा मार्ग " या नवोक्रमातून शक्य झाले आहे .**

# नवोपक्रमाची गरज व महत्त्व

बावीस मार्च दोन हजार वीस पासून आलेल्या कोरोना संकटामुळे शिक्षण क्षेत्र पूर्ण खोळंबून गेले. प्रत्यक्ष विद्यार्थ्यांचा सहवास नसल्यामुळे आंतरक्रिया खोळंबली. असे वाटले लॉकडाऊन संपल्यानंतर पुन्हा आंतरप्रक्रिया सुरू होईल. परंतु कोरोना थांबायचे नाव घेईन ना. मग मात्र विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवायचे ठरविले यासाठी प्रथम वर्ग दहावीचे गणित विषयासाठी ऑनलाइन वर्ग सुरु करायचे ठरवले त्यासाठी वर्तमानपत्रात तालुक्यासाठी गणित विषयाचे मोफत अध्यापन करायचे म्हणून जाहिरात दिली यामुळे तालुक्यातील विद्यार्थ्यांचा ग्रुप तयार झाला 100 पेक्षा जास्त विद्यार्थी सहभागी झाले त्यांना दररोज प्रकरण नुसार घटकानुसार अध्यापनात सुरुवात केली. टिचिंग व्हिडिओ पाठविले यूट्यूब चैनल निर्माण करून सर्व जिल्ह्यासाठी उपक्रम राबविण्यास सुरुवात यातून आत्मविश्वास वाढला हा उपक्रम सुरू असल्याचे असे लक्षात आले की सध्या तर लॉकडॉऊन आहे जे ते आपापल्या परीने आपापल्या विषयासाठी उपक्रम राबवून अभ्यासक्रम पूर्ण करता येते परंतु शिष्यवृत्ती मार्गदर्शना बाबत काय? असा प्रश्न मनात आला. शिवाय

यवतमाळ जिल्हयाचा राष्ट्रीय प्रज्ञाशोध परीक्षेत मागील पाच वर्षापासून चा निकाल शून्य टक्के होता . बऱ्याच दिवसापासून मनात निकाल वाढविण्याची कल्पना होती परंतु संधी मिळत नव्हती आता संधी जशी काय चालून आली असे मनाला वाटले. याच्या कारणाचा शोध घेतला असता राष्ट्रीय प्रज्ञा शोध परीक्षेत (NTS) मध्ये जो बौद्धीक क्षमता (mental ability test- MAT) पेपर असतो याच विद्यार्थ्यांना योग्य मार्गदर्शन मिळत नाही त्यामुळे या घटका संदर्भात विद्यार्थ्यांच्या संकल्पना स्पष्ट होत नाही त्यामुळे हा नवा उपक्रम राबविण्याचे ठरविले . लॉकडाऊन असल्यामुळे शाळा बंद होत्या त्यामुळे मला भरपूर वेळ मिळाला मी . MAT च्या संदर्भात प्रत्येक घटकाला महत्त्व देऊन विद्यार्थ्याला या वरील कोणताही प्रश्न Within a second कसे सोडता येईल याबाबत Tricksतयार करण्याची मला संधी मिळाली. या काळात राज्यातील बऱ्याच शिक्षकांनी वेगवेगळे उपक्रम राबविले परंतु सामान्यपणे उपक्रम स्वतःच्या विषयासंदर्भात होते. जो तो आपले विषय कसे पूर्ण करता येईल या संदर्भात विचार करत होता .परंतु माझ्या लक्षात आले की वर्ग दहावी साठी असलेली एन टी एस परीक्षा राष्ट्रीय स्तरावर असल्यामुळे याबाबत विद्यार्थ्यांना कोण मार्गदर्शन करणार ? असा विचार मनात आला त्यामुळे मी योग्य Tricks सह विद्यार्थ्यांच्या पुढे गेलो आणि ऑनलाईन मार्गदर्शन करण्यासाठी व्हाट्सअप ग्रुप ची निर्मिती केली ही माझ्या उपक्रमात नाविन्यता आहे किंवा इतरांपेक्षा हा माझा उपक्रम वेगळा आहे असे म्हणता येईल . हा उपक्रम केवळ अभ्यासक्रमावर आधारित शिष्यवृत्ती परीक्षेसाठी मर्यादित नसून या उपक्रमातून विद्यार्थ्यांमध्ये युपीएससी-एमपीएससी सारख्या स्पर्धा परीक्षेकडे कल वाढवण्याचा या उपक्रमातून माझा प्रामाणिक प्रयत्न आहे . विद्यार्थ्यांना याबाबत योग्य संबोध मिळाले तर त्यांना स्पर्धा परीक्षेविषयी गोडी लागेल आणि जेव्हा तो स्पर्धेच्या शर्यतीत उतरेल तेव्हा खऱ्या अर्थाने त्याचा सर्वांगीण विकास साधला जाईल , या हेतूने हा उपक्रम हाती घेतला . शालेय उपक्रमातून स्पर्धा परीक्षेकडे नेणे ही उपयुक्तता माझ्या

उपक्रमात आपणास दिसून येईल . आपल्या राज्याचा उत्तर-दक्षिण राज्याच्या तुलनेत यूपीएससीमध्ये यशस्वितेचा टक्का कमी आहे माध्यमिक स्तरावर त्यांना योग्य मार्गदर्शन करून गोडी लावली तर निश्चितच राज्याचा टक्का यूपीएससी परीक्षेत वाढेल या विचारातून हा उपक्रम हाती घेतला . व्हाट्सअप ग्रुप , वर्तमानपत्रातून मोफत एनटीएस वर्गा बद्दल माहिती दिली. पाहता पाहता जिल्ह्यातील 100 पेक्षा जास्त विद्यार्थी सहभागी झाले याच वेळात झूम ॲप सारखे मार्गदर्शक ॲप प्रसिद्धीस आले. बस या संधीचे सोने करायचे ठरविले या परीक्षेत जर विद्यार्थी यशस्वी झाला तर जोपर्यंत शिक्षण चालू आहे तोपर्यंत शिष्यवृत्ती मिळते .त्यामुळे शिकतांना परिस्थिती जरी आडवी आली तरी शिष्यवृत्तीमुळेच शिक्षणात खंड पडत नाही हा फायदा शिष्यवृत्ती मुळे होतो . शिवाय शहरी व ग्रामीण भागासाठी एकच मार्गदर्शन व्यासपीठ उपलब्ध असल्यामुळे शहरी व ग्रामीण भागातील दरी यामुळे दूर होणार आहे त्यामुळे शिष्यवृत्तीपासून वंचित असणाऱ्या ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना देखील या उपक्रमामुळे निश्चितच फायदा होईल असे मला वाटले . संचारबंदी असल्यामुळ पूर्ण विद्यार्थी देखील घरीच होती त्यामुळे बंद झालेले शिक्षण कसं सुरू करता येईल यासाठी ते उत्सुक होते, या सर्व गोष्टीचा सारासार विचार करून मी हा नवीन उपक्रम माझ्या हाती घेतला आणि तो राबवण्यास सुरुवात केली .

## विद्यार्थ्यांना ग्रुप मध्ये समाविष्ट करून घेण्यासाठी त्यांच्याशी व्हाट्सअप ग्रुप द्वारे साधलेला संवाद

AUGUST 23, 2020

विद्यार्थी मित्रांनो या ग्रुप वर राष्ट्रीय प्रज्ञाशोध परीक्षा वर्ग १०वी साठी असते . ती पास झाल्यावर दरमहिन्याला २००० रूपये याप्रमाणे तुमचे शिक्षण जोपर्यंत सुरू आहे तो पर्यंत शिष्यवृत्ती मिळते. पहिला पेपर तुमच्या अभ्यासक्रमावर असतो तर दुसरा पेपर मी शिकविणार आहे याशिवाय तुम्ही जेंव्हा स्पर्धा परीक्षा देणे सुरुवात कराल तेव्हा या tricks चा तुम्हाला फायदा होईल . सर्वांनी zoom app download करावे , सदर class live असतील. शिकत असतांना वही आणि पेन सोबत ठेवावे , मी काय शिकवितो ते note करुन घ्यावे. हे class दोन्ही माध्यमातील विद्यार्थ्यांसाठी आहे . एक दोन दिवसात त्याची सुरुवात करत आहे .

4:31 PM

हा माझा उपक्रम आहे , विद्यार्थ्यांना योग्य direction देणे , lockdown मूळे भरपूर वेळ मिळत आहे त्यामूळे मी तुमच्यासाठी सर्व मोफत करत आहे government कडून मला भरपूर पगार मिळतो . NTS अशी exam आहे की विद्यार्थ्यांना teacher वेळेअभावी proper guidance देऊ शकत नाही त्यामूळे ते पास होऊ शकत नाही. ते देण्याचा माझा प्रामाणिक प्रयत्न आहे . पुन्हा एकदा हे class free आहेत. विद्यार्थी success झाले तर तीच माझी fee आहे धन्यवाद .

4:57 PM

# जिल्ह्यातील विद्यार्थ्यांना सहभागी करून घेण्यासाठी न्युज पेपर मध्ये बातमी





## यवतमाळ जिल्ह्यातील विद्यार्थ्यांसाठी राष्ट्रीय प्रज्ञाशोध परीक्षा तयारी

पुसद (का.प्र.): जिल्ह्यातील विद्यार्थीसाठी NTS शिष्यवृत्ती वर्गाचे ऑनलाईन मार्गदर्शन वर्ग सुरू करण्यात आले आहे . यासाठी महात्मा मुंगसाजी विद्यालयाचे शिक्षक उमेश इंगळे यांनी घरीच NTS Room निर्माण केली आहे. या रूम च्या माध्यमातून ते विद्यार्थांना ऑनलाईन धडे देत आहे यासाठी त्यांनी Mission NTS YAVATMAL DISTRICT GROUP निर्माण केला आहे. सदर परीक्षा ही १०वी साठी असून ज्यांना या ग्रुप मध्ये समाविष्ट व्हायचे आहे त्यांनी ८२७५५०२०६६ या नंबरवर आपले नाव , शाळेचे नाव, तालुका पाठवायचा आहे. जिल्ह्यातील वर्ग १०वी ला असणारा मराठी व इंग्रजी माध्यमाचा विद्यार्थी यामध्ये समाविष्ट होऊ शकतो . सदर वर्ग मोफत आहेत त्यांचा हा lockdown उपक्रम आहे यासाठी प्रत्येकाला zoom app download करावे लागणार आहे.

# नवोपक्रमाची उद्दीष्टे

1 ) यवतमाळ जिल्हयाचा शिष्यवृत्ती परीक्षेमध्ये निकाल  वाढविणे ( राष्ट्रीय प्रज्ञाशोध परीक्षा )

२) एकच व्यासपीठ उपलब्ध असल्यामुळे ग्रामीण व शहरी दरी दूर करणे

३) विद्यार्थ्यांमध्ये असलेल्या चिकित्सक वृत्तीला , तर्कशक्ती , कल्पनाशक्ती ला वाव देणे

4) स्पर्धात्मक परीक्षेसाठी विद्यार्थ्यांना तयार करणे

5) विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढविणे

वरील उद्दीष्ट साध्य  करण्याचा माझ्या या नवोपक्रमातून माझा प्रामाणिक प्रयत्न होता  त्या दृष्टीने माझ्या उपक्रमाचे नियोजन मी केले  होते.

# नवोपक्रमाचे नियोजन

राष्ट्रीय प्रज्ञा शोध परीक्षेबाबत विद्यार्थ्यांच्या मनामध्ये भीती होती ही परीक्षा खूप अवघड असते यामध्ये यशस्वी होणे शक्य नाही अशा प्रकारची त्यांची विचारधारा होती. त्यांच्यामध्ये परीक्षेबाबत बिलकुलच आत्मविश्वास नव्हता या संदर्भामध्ये मी जिल्ह्यातील मुख्याध्यापक व शिक्षक यांच्याशी चर्चा केली. त्यामधून असे निष्पन्न झाले की राष्ट्रीय प्रज्ञाशोध परीक्षेत दोन पेपर असतात SAT व MAT यापैकी SAT हा पेपर अभ्यासक्रमाशी संबंधित असतो आणि MAT हा पेपर बौद्धिक क्षमतेशी संबंधित असतो याचा अभ्यासक्रम जास्त असल्यामुळे विद्यार्थ्यांना योग्य मार्गदर्शन मिळत नाही त्यामुळे विद्यार्थी याच्यामध्ये यशस्वी होऊ शकत नाही हाच मुद्दा लक्षात ठेवून मी मागील पाच वर्षाच्या बुद्धिमत्ता क्षमतेशी संबंधित असलेल्या प्रश्नपत्रिका एम एस सी ई पुणे या संकेतस्थळावरून काढल्या त्याचा अभ्यास केला त्या पूर्णता सोडविल्या ,within seconds प्रश्न कसे सोडवायचे याच्या युक्त्या शोधून काढल्या यासाठी माझ्या घरची एक रूम NTS Room म्हणून निर्माण केली. अभ्यासक्रमातील प्रत्येक घटका नुसार तक्ते तयार केले. त्या चार्ट ने एनटीएस रूम सजविली जेणेकरून प्रत्येक घटकाला महत्त्व दिले जाईल आणि अध्यापन करण्यास सुलभ जाईल हे सर्व करण्यासाठी मला दोन महिने लागले यानंतर " Mission NTS YAVATMAL District group " विद्यार्थ्यांसाठी निर्माण केला विविध माध्यमाद्वारे संदेश पाठवून या ग्रुप मध्ये विद्यार्थ्यांना समाविष्ट करून घेतले जवळपास 160 विद्यार्थी सुरुवातीला या ग्रुपमध्ये समाविष्ट झाले 23 ऑगस्टला हा ग्रुप मी निर्माण केला. यानंतर अध्यापन करण्यात येणाऱ्या घटकाचे व्यवस्थितपणे नियोजन केले एक दिवस टॉपिक शिकवायचा आणि विद्यार्थ्यांना त्यावर आधारित गृहपाठ

द्यायचा व दुसऱ्या दिवशी तो तपासून द्यायचा स्वाध्याय सोडवताना काही अडचणी आल्यास पुन्हा त्यांना मार्गदर्शन करायची अशा प्रकारचे नियोजन विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी मी केले त्यानंतर वेळापत्रकानुसार प्रत्यक्ष कार्यवाहीला सुरुवात केली 25 ऑगस्ट पासून प्रत्यक्ष अध्यापनास सुरुवात करण्याचे नियोजन केले .सर्वप्रथम विद्यार्थ्यांना झूम ॲप डाऊनलोड करायला सांगितले विद्यार्थ्यांना झूम ॲप द्वारे कसे जॉईन व्हायचे या बाबत मार्गदर्शन केले .अशाप्रकारे नियोजनबध्द उपक्रमाला सुरुवात केली. मुलगा हा गर्भ संस्कारातून धडे घेत आहे असल्यामुळे त्याची ज्ञानाची भूक वाढलेली आहे देशात काही उदाहरणे अगदी वयाच्या दहाव्या वर्षीच काही विद्यार्थ्यांनी पदवी घेतली आहे अशा प्रकारे विद्यार्थ्या ज्ञान मिळविण्याची स्पर्धा निर्माण झाली आहे यासाठी प्रत्येक शिक्षकाने अपडेट असणे आवश्यक आहे कालबाह्य ज्ञानाला विसरून नवीन नवीन तंत्र आत्मसात केली पाहिजे पारंपारिक ज्ञानापेक्षा विद्यार्थ्यांना अद्ययावत ज्ञान देणे आवश्यक आहे कारण विद्यार्थी युट्युब सारख्या चॅनलच्या माध्यमातून शिकुन अधिक ज्ञान आत्मसात करतो त्यामुळे शाळेकडून त्याची ज्ञान घेण्याची क्षमता अपेक्षा वाढली आहे त्यामुळे शिक्षकांनी देखील काळानुरुप बदलणे आवश्यक आहे सध्या लॉकडाऊन असल्यामूळे विद्यार्थ्या पर्यंत पोचायचे ठरविले यासाठी सर्वप्रथम मोबाईल या तंत्रज्ञानाचा उपयोग घ्यायची ठरवले लॉक डाऊन असल्यामुळे माईक स्टँड मिळत नव्हते अशावेळी कंपासच्य खोबणीचा उपयोग केला. अशा वेळी घरची एक रुम वर्गखोली म्हणून तयार केली ,या सर्व गोष्टींची सांगड घालून सर्व प्रथम वर्ग दहावी साठी तालुक्यातील विद्यार्थ्यांना गणित विषयाच व्हाट्सअप ग्रुपच्या माध्यमातून टिचिंग व्हिडिओ पाठवून अध्यापन केले शिकविलेल्या घटकावर गृहपाठ देऊन ते तपासून घेणे अशा प्रकारे कृतीवर जास्तीत जास्त भर दिला त्या कृतीची व्हिडिओज विद्यार्थ्यांना निर्देशनास येतील त्यादृष्टीने उपलब्ध साधनाचा योग्य

वापर करण्याचा विचार मनामध्ये आला . या अध्यापनात अद्यायावतपणा आणून झूम अॅपव्दारे प्रत्यक्ष Live अध्यापनास सुरुवात केली.

25 ऑगस्ट पासून प्रत्यक्ष वर्गाला सुरुवात केली. अध्यापन करत असताना असे लक्षात आले की विद्यार्थ्यांना काही पायाभूत गोष्टी माहिती नाही त्या सर्वप्रथम शिकविले .काही सेकंदातच प्रश्न कसे सोडवायचे या ट्रिक्स शोधून काढल्यामुळे विद्यार्थ्यांना कोणतेही प्रश्न सहजासहजी सोडविणे शक्य होऊ लागले त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये उत्साह संचारला त्यांना गोडी लागली . वेळापत्रकानुसार परीक्षेला असलेले घटक शिकविने त्यांना मी सुरू केली. दोन तास शिकवायचे आणि वर्ग संपल्यानंतर त्यांना स्वाध्याय द्यायचा दुसऱ्या दिवशी तो तपासून द्यायचा एखादा घटक समजला नसेल तर त्याची टिचिंग व्हिडिओ करून पाठवायचे असे जवळपास तीन महिने सुरू होते 5 ,6 टॉपिक झाले की लगेच त्याच्यावर ऑनलाईनपरीक्षा घ्यायची ऑनलाईन परीक्षेसाठी गुगल फॉर्म चा वापर केला. परीक्षा दिलेल्या विद्यार्थ्यांचा निकाल तयार करायचा आणि त्यामध्ये जे टॉपर विद्यार्थी आहे असे तीन विद्यार्थी काढायची आणि त्यांचे अभिनंदन करायचं यामुळे विद्यार्थ्यांमध्ये स्पर्धात्मक ओढ लागली. एखाद्या विद्यार्थ्यांना क्लास सुरू असताना नेटवर्कचा जर प्रॉब्लेम आला समस्या आली अशावेळी ग्रुप वर त्यासंदर्भात टिचिंग व्हिडिओ टाकायच आणि त्यांच्या शंकासमाधान दूर करायच अशा प्रकारची पद्धती मी अवलंबिली. हे सगळ करत असताना संचारबंदी असल्यामुळे संपूर्ण दुकाने बंद होती अशा वेळेस मित्रा कडून ब्लॅकबोर्ड, डिजिटल ब्लॅकबोर्ड मिळविला त्याच्या समोर एक टेबल ठेवला परंतु संचार बंदी मुळे मोबाईल ला मला स्टैंड मिळू शकले नाही .अशा वेळेस एक कंपास घेऊन त्याच्या खोबणी मध्ये मोबाईल फिट करायचा आणि विद्यार्थ्यांना झूम अॅप द्वारे लाईव्ह मार्गदर्शन करायचे अशा प्रकारचे मार्गदर्शन विद्यार्थ्यांना सतत तीन महिने मी केले दर रविवारी झालेल्या घटकावर ऑनलाइन परीक्षा घेऊन त्यांना सोमवारी निकाल देत असे आणि ज्या काही गोष्टी

त्यांना जमले नाही त्याचा टिचिंग व्हिडिओ विद्यार्थ्यांना ग्रुप वर पाठवत असे .अशा एकूण सात ऑनलाईन परीक्षा घेतल्या त्यामुळे विद्यार्थ्यांची चांगली तयारी झाली. त्यांचा या परीक्षेबाबत आत्मविश्वास वाढला आणि त्यांच्या मनात आपण  यशा जवळ पोहोचत आहे अशा प्रकारची भावना निर्माण झाली.प्रत्येक घटका चे प्रात्यक्षिका आधारे अध्यापन करत असल्यामुळे त्यांच्या जिज्ञासेला कृतीयुक्त जोड मिळाली.परिणामी विद्यार्थी परीक्षेसाठी चांगले तयार झाले. काही कारणास्तव म्हणजेच नेट प्रॉब्लेम मुळे तासिका अटेंड करू शकला नाही तर त्यासाठी युट्युब चॅनेल ची निर्मिती केली जो घटक शिकला त्याची व्हिडीओ निर्मिती करून विद्यार्थ्यांना ग्रुप वर पाठवणे आणि ज्ञानाचे दृढीकरण करणे असा सातत्यपूर्ण माझा उपक्रम सुरू होता. मुलांनाही ऑनलाइन शिक्षण नवीन अनुभव असल्यामुळे त्यामध्ये त्यांना अधिक रस वाटू लागला .ग्रुप वर माझ्या लिंक ची वाट पाहत असे एखाद्या वेळेस लिंक पाठवण्यास उशीर झाला की लगेच त्यांचा फोन येत असे. उपक्रमाची सुरुवात केली तेव्हा विविध माध्यमातून विद्यार्थ्यांना जोडायला वेळ लागला ,मोबाईल सारख्या विद्यार्थ्यांना समस्या होत्या परंतु जी मी जेव्हा कृतियुक्त अध्यापन सुरुवात केली त्यावेळी विद्यार्थी नातेवाईक शेजारी यांच्याकडून त्यावेळेस मोबाईल उसना घेत आणि शिक्षणाचा आनंद घेत होती अशा प्रकारे विद्यार्थ्यांनी परिस्थितीवर मात करून ऑनलाईन शिक्षणाची कास धरली संपूर्ण घेतलेल्या चाचण्या ची लिंक खाली देत आहे यामधून त्यांची एनटीएस ची तयारी खूप चांगली झाली परिणामी ग्रुपचे भरपूर विद्यार्थी पास झाली.उपक्रम पूर्वस्थितीत विद्यार्थी प्रवाहात आणताना च्या अडचणी आणि मार्गदर्शनामुळे विद्यार्थ्यांमध्ये वाढलेला उत्साह ग्रामीण व शहरी भागातील विद्यार्थ्यांना एकच व्यासपीठ उपलब्ध करून ग्रामीण-शहरी दूर करून समानता साधण्याचा प्रयत्न आणि त्यातून मिळालेले यश निश्चितच प्रेरणादायी आहे. उपक्रमा नंतर विद्यार्थी आलेल्या शंकाचे निरसन फोन करून तसेच व्हाट्सअप ग्रुप च्या माध्यमातून मेसेज करून घेत होते.

**विद्यार्थी रोजच्या रोज शिकविलेल्या घटकावर अभ्यास करून मला अभ्यासाचे फोटो पाठवत होते . ग्रामीण भागातील विद्यार्थी एकमेकांच्या सहकार्याने उदाहरण सोडून दाखवण्याचे काम करत होती. परंतु त्यांना येणाऱ्या शंकांचे निरसन करण्यासाठी मला सतत क्रियाशील राहावे लागत असे. पालक सुद्धा ऑनलाइन शिकतांना कधी कधी उत्सुकते पोटी त्यांच्यासोबत सहभागी होत होते कारण ऑनलाइन शिक्षणाचा त्यांचा पहिला अनुभव होता. विविध ट्रिक्स, लॉजिक वापरून बौद्धिक क्षमतेची उदाहरणे सोडवितांना विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढला होता. तर्कशक्ति ,कल्पना शक्तीचा उपयोग होत असल्यामुळे त्यांना स्पर्धापरीक्षेची वेड लागले होते. त्या संदर्भात मला कोणत्या वर्गात नंतर स्पर्धा परीक्षा असते अशी विचारणा विद्यार्थी करत होते .**

**जसा ऑनलाईन क्लास पुढे जात होता उपस्थिती दिवसागणिक वाढत होती सामान्यपणे ते 80 ते 85 टक्के होती. या उपक्रमामुळे जिह्यातील विद्यार्थ्यांशी माझे नाते दृढ झाले होते .विद्यार्थी अत्यंत आत्मविश्वासाने परीक्षेला सामोरे गेले ,यशस्वी होणार या निर्धाराने !**

## शिक्षक व मुख्याध्यापक यांच्या सहकार्याने माझ्या उपक्रमाला सुरुवात

जिल्ह्यातील आदरणीय मुख्याधापक , शिक्षक बंधू भगिनिंनो आपल्या सर्वांच्या सहकार्याने MISSION NTS YAVATMAL DISTRICT GROUP तयार झाला. पाहिला NTS class घेत आहे . अमरावती , वाशिम जिल्ह्यातील विद्यार्थ्यांच्या request आल्या , काही शिक्षकांच्या request आल्या की आम्हाला सहभागी करुन घ्या , सर्वप्रथम हा class attend करा नंतर प्रतिक्रिया दया व मग ठरवा या शिवाय जे प्रथमच स्पर्धा परीक्षा Face करत आहे ते देखील सहभागी होऊ शकतात कारण mpsc च्या एका पेपरशी याचा संबंध आहे. फक्त या class साठीच सर्वत्र link उपलब्ध असेल नंतर NTS groupसाठीच link उपलब्ध असेल. लक्षात ठेवा हा माझा lockdown उपक्रम असल्यामूळे वर्ग हे मोफत आहे.
Class मध्ये सहभागी होण्यासाठी
8275502066 ला details पाठवा .

उमेश इंगळे

महात्मा मुंगसाजी विद्यालय पुसद जि यवतमाळ

Topic : Introduction of NTSE and Numericals Series
पुढील link ला click करा

| अ. क्र. | Date | Teaching Topics |
|---|---|---|
| 1 | 25 Aug 2020 | Introduction of NTS |
| 2 | 27 Aug 2020 | Numerical series |
| 3 | 29 Aug 2020 | Arithmetic sign and Pyramid |
| 4 | 31 Aug 2o To 2 sept | Alphabetical series rules 1,2,3,4 |
| 5 | Sept 4 2020 | Letter series |
| 6 | 6 Sept 2020 | Venn diagram |
| 7 | 8 Sept 2020 | syllogism |
| 8 | 10 Sept 2020 | Direction |
| 9 | 12 Sept 2020 | clock |
| 10 | 14 Sept 2020 | calender |
| 11 | 16 Sept 2020 | Seating Arrangement |
| 12 | 18 Sept 2020 | Blood relation and relation coding |
| 13 | 20 Sept 2020 | Online Exam 1 |
| 14 | 22 Sept 2020 | Ranking order |
| 15 | 24 Sept 2020 | Age |
| 16 | 26 Sept 2020 | Countable Triangles Tricks |
| 17 | 28 Sept 2020 | Counting square |
| 18 | 30 Sept 2020 | Mirror and water images |
| 19 | 2 oct 2020 | Dice |
| 20 | 4 oct 2020 | 2nd online Exam |
| 21 | 18 Oct 2020 | 3rd Online Exam |
| 22 | 20 Oct 2020 | Cube and cuboid |
| 23 | 31 Oct 2020 | Figure relation and embedded figure |
| 24 | 1 Nov 2020 | 4th online Exam |
| 25 | 15 Nov 2020 | 5th online Exam |
| 26 | 29 Nov 2020 | 6th online Exam |
| 27 | 6 dec 2020 | 7th online Exam |

| | | |
|---|---|---|
| **28** | **7 To 12 dec 2020** | **Math guidance** |

**अश्या प्रकारे योग्य नियोजन, वरील वेळापत्रकानुसार जिल्ह्यातील विद्यार्थांना योग्य मार्गदर्शन केले. प्रत्येक चाचणी विद्यार्थाला प्रेरणा देत होती , चाचणी सोडवायची ,Submit केल्यानंतर विद्यार्थाला मार्कस कळत होते ,लगेच कुठे चुकले हे कळत असल्यामूळे चुकांतून बोध घेत होते .चुका आणि शिका या तत्त्वानुसार विद्यार्थी चांगल्या प्रकारे परीक्षेची तयारी करत होते आणि अडचण आल्यास मार्गदर्शन घेत होते अशाप्रकारे परीक्षेसाठी त्यांची चांगली तयारी झाली.**

## नवोपक्रमाची यशस्विता / फलनिष्पती

नवोपक्रमाचे मुल्यमापन करावयाचे झाल्यास प्रारंभी ठरवलेली उद्दीष्ट कीती प्रमाणात साध्य झाली ? याचा पडताळा घेणे महत्वाचे आहे. यासाठी शिक्षक विद्यार्थी आंतरक्रीया व्यवस्थित होणे आवश्यक आहे. ज्ञान हे एकमार्गी न होता द्वि मार्गी झाले पाहीजे . अर्थातच विद्यार्थी शिक्षक संवाद योग्य दिशेने झाला पाहिजे. शाळा बंद आणि विद्यार्थी आपल्या घरात शिक्षण थांबलेली ही अस्वस्थता शांत बसू देत नव्हती .बरेच दिवसापासून हा विषय विद्यार्थ्यांमध्ये पोहोचवावा असे वाटत होते परंतु वेळ मिळत नव्हता आणि कसे पोहचावे हे सुचत नव्हते, कोरोना आला तो संधी घेऊन ! संपूर्ण जगात एकाच वेळी लॉक झाले. कधी नव्हते अशी भयानक स्थिती निर्माण झाली .विद्यार्थ्यांपर्यंत कसे पोहचायचे मन अस्वस्थ होत होते. कारण पारंपरिक पद्धतीच्या अध्यापनापलीकडे कधीच गेलो नव्हतो. शोधाशोध चालू होती की कोणते तंत्रज्ञान नवीन आले जे आपणास घरी बसून विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविता येईल. यूट्यूब चैनल ची निर्मिती करून व्हाट्सअप च्या आधारे विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचण्याच ठरविले या अनुभवातून नवीन नवीन कल्पना मनात येऊ लागल्या. त्यातच झूम ॲप द्वारे इतरांचे सेमीनार ऐकत होतो लगेच कल्पना आली की झूम ॲप द्वारे लाईव्ह विद्यार्थ्यापर्यंत पोचायचे .विविध माध्यम वर्तमानपत्रातून मनात असलेला माझा उपक्रम विद्यार्थ्यांना सांगीतला, त्यांचा ग्रुप तयार केला, वेळापत्रकानुसार त्यांना अध्यापन केले, हळूहळू माझा हा उपक्रम यूट्यूब च्या माध्यमातून राज्यभर पसरविला. जेव्हा मी एमपीएससी ची परीक्षा तयारी करीत असताना जे काही ज्ञान प्राप्त केले ते विद्यार्थ्यांपर्यंत पोचवण्याचे आत्मिक समाधान मला लाभले. सर्वजण घरी असल्यामुळे आणि मोबाईल या काळात गरजेची वस्तू असल्यामूळे ऑनलाइन शिक्षण देत असताना फारशी अडचण येत नव्हती . त्यामुळे सुसंवाद व्यवस्थित झाला होता. अध्यापन - अध्ययन -शंका

-उपचारात्मक अध्यापन – चाचणी मुल्यमापन शेवटी Output या टप्प्यातून उपक्रमाची क्रिया चालत असल्यामुळे विद्यार्थ्यांच्या प्रगती लक्षात येत होती. प्रत्येक घटकांचा संबोध त्यांच्या मनात चांगला रुजला होता त्यामुळे हा नवा उपक्रम यशस्वी झाला असे ठामपणे सांगू शकतो. सदर उपक्रम वर्ग दहावीतील विद्यार्थ्यांसाठी होता त्यामध्ये जिल्ह्यातील 100 पेक्षा जास्त विद्यार्थी सहभागी झाले .त्यांना योग्य युक्त्या वापरून मार्गदर्शन केले ,सात ऑनलाईन सराव परीक्षा घेतल्या त्यामुळे विद्यार्थ्यांची चांगली तयारी झाली. एनटीएस रूममधून झूम ॲप द्वारे शिकवताना त्यांना अध्यापनात वेगळेपणा वाटला त्यामुळे शिकतांना त्यांची रुची वाढली .प्रत्यक्ष लाईव्ह उदाहरणाद्वारे अध्यापन केल्यामुळे सर्व संकल्पना स्पष्ट झाल्या. परिणामी 50 पेक्षा जास्त विद्यार्थी एन टी एस मध्ये पास झाले आणि तीन विद्यार्थी एनटीएस साठी पात्र ठरली. गुगल फॉर्म चाचणीमुळे लगेच निकाल कळत असल्यामुळे विद्यार्थी कोणतीच उणीव ठेवत नव्हते. प्रथम येण्यासाठी धडपडत होते विद्यार्थ्यांना ऑनलाइन चाचण्या देतांना मजा वाटू लागली विद्यार्थी सोडण्याचा आनंद घेऊ लागले निकाल लगेच मिळत असल्याने विद्यार्थी वारंवार चाचणीची मागणी करू लागले आणि ती मी पूर्ण करू लागलो अशाप्रकारे माझ्यात आणि विद्यार्थ्यांमध्ये ऋणानुबंध निर्माण झाला यातून त्यांची चांगल्या प्रकारे परीक्षेची तयारी झाली परीक्षेचा निकाल चांगला लागला आणि माझं नाव करून यशस्वी झाल्याची मला समाधान मिळाले हे या उपक्रमाचे फलित आहे .त्या वेळी बातम्या येत होते की जगातील शिक्षक कशाप्रकारे ऑनलाईन विद्यार्थ्या पर्यंत पोहोचत आहेत ,त्यात पण आपला खारीचा वाटा आहे हे समाधान मला या उपक्रमातून लाभले .पारंपारिक अध्यापनपेक्षा नाविन्यता असलेला माझा उपक्रम जवळपास चार महिने चालला आणि चांगल्या रीतीने यशस्वी झाला. यवतमाळ जिल्ह्यात राष्ट्रीय प्रज्ञाशोध परीक्षेचा निकालाचा टक्का वाढला याचे मला समाधान वाटले.

## मिळालेले Output

# उमेश इंगळे यांच्या मिशन एनटीएसला यश

### ग्रपचे तीन विद्यार्थी राष्ट्रीय प्रज्ञाशोध परीक्षेत उत्तीर्ण

पुसद (का.प्र.): गेल्या ५ वर्षात जिल्ह्याचा एकच विद्यार्थी एनटीएस साठी पात्र ठरला. निकाल वाढविण्याचे आव्हान महात्मा मुंगसाजी विद्यालयाचे उपक्रमशील शिक्षक उमेश इंगळे यांनी स्विकारले. लॉकडाऊन असल्यामुळे त्यांनी स्वतःच्या घरी एनटीएस रुम निर्माण केली. मार्गदर्शन करण्यासाठी मीशन एनटीएस या जिल्हा ग्रुपची निर्मीती केली. फार मोठ्या प्रमाणात विद्यार्थ्यांना सहभागी करुन घेतले. ज्यांनी झूम ॲपच्या माध्यमातून सज्ञ तीन महीने मार्गदर्शन केले. सराव चाचण्या घेतल्या.

राष्ट्रीय स्तरावर परिक्षा होत असल्यामुळे ती आवानात्मक असते. या मध्ये यशस्वी होणाऱ्या विद्यार्थ्यांला जो पर्यंत शिक्षण सुरु आहे तो पर्यंत शिष्यवृत्ती मिळते. त्यामुळे आव्हानात्मक स्पर्धा असते. त्यांच्या या आव्हानात्मक मार्गदर्शनामुळे ग्रुपचे तीन विद्यार्थी चार्वाक जांभूळकर जोतिर्गमय स्कूल, स्वप्नील ठाकरे, दिनबाई विद्यालय आणि वैष्णवी वाघमारे हे उत्तीर्ण झाले. यापूर्वीच त्यांच्या या उपक्रमाचे माध्य. शिक्षणाधिकारी दिपक चवणे आणि प्राथ. शिक्षणाधिकारी प्रमोद सुर्यवंशी यांनी वैयक्तीक संदेश पाठवून त्यांच्या कार्याचा गौरव केला. अतिशय उपक्रमशील असलेल्या इंगळे सरांनी लॉकडाऊन मध्ये चार उपक्रम राबविले. यावर्षी देखील त्यांनी वर्ग ८ ते १० च्या विद्यार्थ्यांसाठी गणित विषयाचे क्रयेटीव्ह एज्युकेशनल चॅनल काढले त्यामुळे विद्यार्थ्यांनी घरी बसून गणित शिकायला मिळणार आहे.


## समारोप


विद्यार्थी हा मातीचा गोळा असतो .त्याला जसा आकार द्याल तसा तो बनतो शिकत असताना विविध प्रकारच्या  शिष्यवृत्ती परीक्षा विद्यार्थ्यांसाठी असतात. त्याबद्दल विद्यार्थ्यांना माहिती देणे ,मार्गदर्शन करणे हे प्रत्येक शिक्षकाचे कर्तव्य असते .परंतु बरेचदा आपण पाहतो की अनेक शाळेमध्ये याची पुसटशी कल्पना देखील विद्यार्थ्यांना नसते. त्यामुळे विद्यार्थी या शिष्यवृत्ती परीक्षेपासून वंचित राहतो. शिक्षिकांनी गांभीर्याने या गोष्टीचा विचार करायला पाहिजे आणि कुठलीही माहिती असो किंवा स्पर्धा परीक्षा असो या संदर्भामध्ये विद्यार्थ्यांना इत्थंभूत माहिती देणं हे शिक्षकांचे कर्तव्य आहे. ज्यावेळेस राष्ट्रीय प्रज्ञा शोध परीक्षा संदर्भात एनसीआरटी कडून अधिसूचना निघाली त्यावेळेस मी विद्यार्थ्यांना व्हाट्सअप या ग्रुपच्या माध्यमातून संदेश पाठविला. जिल्हयातील ग्रामीण व शहरी भागातील विद्यार्थ्यांना मार्गदर्शनाचे व्यासपीठ उपलब्ध करून दिलं .त्यांना व्यवस्थितपणे मार्गदर्शन केलं ,परीक्षेसाठी तयार केलं या गोष्टीचं आत्मिक समाधान मला लाभलं. राष्ट्रीय प्रज्ञाशोध परीक्षेचा संबंध हा स्पर्धात्मक परीक्षेशी उदाहरणार्थ युपीएससी-एमपीएससी यांच्याशी देखील असल्यामुळे  ह्या  परीक्षेची काठिण्यपातळी थोडी जास्त असते .यामधील  बौद्धिक क्षमतेचा पेपर हा एमपीएससी या परिक्षेची संबंधित असतो त्यामुळे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना त्यांची स्पर्धात्मक परीक्षेचे देखील या माध्यमातून तयारी झाली या गोष्टीची त्यांना मी जाणीव देखील करून दिली. बरेच दिवसापासून राष्ट्रीय प्रज्ञा शोधच्या मार्गदर्शना  बाबत  माझ्या मनात नेहमी विचार यायचा की मी जिल्हयातील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करावे आणि जिल्हयात यशस्वितेचा टक्का वाढावा. परंतु मला अशा प्रकारचे संधी प्राप्त होत नव्हती परंतु संचारबंदी असल्यामुळे आणि विद्यार्थी घरी असल्यामुळे माझ्या मनात घरीच राष्ट्रीय प्रज्ञा शोध परीक्षा या संदर्भामध्ये रूम तयार करून त्यांना मार्गदर्शन


करण्याची संधी प्राप्त झाली ,या संधीचं सोन केल. राष्ट्रीय प्रज्ञाशोध परीक्षा मध्ये महाराष्ट्रासाठी जवळपास 750 विद्यार्थ्यांचा शिष्यवृत्ती कोटा असतो त्यामुळे शिष्यवृत्ती  प्राप्तीसाठी काट्याची स्पर्धा होते. राष्ट्रीय प्रज्ञाशोध परीक्षेत शिष्यवृत्ती मिळवण्यासाठी  सॅट आणि मॅट या दोन्ही पेपर मध्ये 90 ते 95 टक्के पेक्षा जास्त गुण प्राप्त करावे लागतात .तरच तो या शिष्यवृत्तीसाठी पात्र ठरू शकतो. मुंबई पुणे यासारख्या ठिकाणी योग्य मार्गदर्शन केंद्र उपलब्ध असतात .परंतु आमच्यासारख्या ग्रामीण भागामध्ये या मार्गदर्शनाचा अभाव असतो त्यामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थी यामध्ये माघारतात .हा नवीन उपक्रम राबवून  ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचा स्तर उंचवावा या उद्देशाने हा उपक्रम हाती घेतला. माझ्या या मेहनतीचे फळ मला मिळाले बरेच विद्यार्थी परीक्षा पास झाले आणि तीन विद्यार्थी हे शिष्यवृत्तीसाठी पात्र ठरले याचं  आउटपुट शेवटी मला मिळाले. सर्वात महत्वाचे म्हणजे त्यांना मी या माध्यमातून स्पर्धा परीक्षेची कशी तयारी करायची, Tricks वापराुन उदाहरणे Within सेकंड कसे सोडवायचे याबद्दल मार्गदर्शन केलं आणि माध्यमिक स्तरावर स्पर्धा परीक्षेविषयी आवड निर्माण केली.उद्देश एवढाच होता की आपल्या महाराष्ट्रीयन विद्यार्थ्याचा युपीएससी मध्ये टक्का कमी आहे आणि तो जर वाढवायचा असेल तर विद्यार्थ्यांना माध्यमिक स्तरावरच स्पर्धा परीक्षेविषयी आवड निर्माण करून त्यांना कोणतेही प्रश्न कसे सॉल करायचे याबाबतच या एनटीएस मार्गदर्शनाच्या माध्यमातून मी त्यांना मार्गदर्शन केले. यामुळे विद्यार्थी एमपीएससी परीक्षेला जे काही आव्हानात्मक प्रश्न विचारत आहेत ते प्रश्न ग्रुप वर टाकत होते आणि विचारत होते सर हा प्रश्न कसा सोडवायचा हेच या उपक्रमाचं फलित आहे या संदर्भात संपूर्ण माहिती मिशन एनटीएस बाय उमेश इंगळे या यूट्यूब चैनल वर विद्यार्थ्यांना मिळेल.

# नवोपक्रमाचे फोटो



NTS CLASS


9:37
415/3,676
1^2+2^2+3^2= 14
1^2+2^2+3^3= 14
Total = 14+14-1(middle square minus)=27
1) 18
2) 19
3) 25
4) 27
7:40 PM
Q7) Count the number of squares in the given figure
1^2+2^2=5
1^+2^2=5
1^2+2^2-2=3
1^2+2^2-2=3
5+5+3+3=16
1) 13
2) 16
3) 19
4) 20
8:11 PM
Q6) Count the number of squares in the given figure
Share
Edit
Delete
More


In the number series given below
one number is missing
0, 6, 24, 60, 120, ?


9:37
418/3,677
52%
4:39 p.m.
Tanishka
Umesh Ingale
Himanshu zol
Redmi
Share
Edit
Delete
More


9:36
410/3,674
Close
Participants (43)
SM Sanskruti Mude
SP Sejal Palikondawar
Shubhangi Ade
ST Swapnil Thakare
S Swati satpute
TD Tanmay durge
TA Tejal Aawte
US Utkarsh shviram barde
V Vaibhav Pande
VD Vedika Dilip
DOC
Share
Edit
Delete
More


9:37
413/3,675
MISSIONS NTS YAVA...
Created by You, 8/23/20
103 participants
Add participants
Invite via link
You
Group Admin
Contact me for online classes of 10th mat...
+917498602463
Busy
7
8
सत्य परेशान होता है पराजित नही
Ajinkya Nts
"Take a deep breath. Remember – it's not...
Share
Edit
Delete
More

## सराव चाचणी



**MISSION NTS YAVATMAL DISTRICT GROUP**

Participatant : **Over 160  Students**

**NTS Exam 3**

Date : **18/10/2020 Sunday**


Time : **4 pm to 5 pm**

**Click link** 👇 👇

https://docs.google.com/forms
/d/e/1FAIpQLSc7Et4uU4P9J
_frCFr6a0HqP6E057akfbeSvHxID
_lSjmmWEQ/viewform

**Umesh B Ingale Mahtma Mungsaji Vid Pusad**

3:11 PM ✓



4G 6:27 ··· 83

1,501/1,624

# MISSIONS NTS YAVATMAL DISTRICT GROUP

Total points 28/30 ?

Created by Umesh b ingale Mahatma mungsaji vid pusad dist Yavatmal
NTS first exam     Mental ability Test
Mark 30     Time 1 hr

0 of 0 points


Name *

Anuradha shinde

School Name *

Dnyanprakash vidyalaya

Share Edit Delete More



4G 6:27 ··· 83

1,499/1,624

# MISSIONS NTS YAVATMAL DISTRICT GROUP

Total points 28/30 ?

Created by Umesh b ingale Mahatma mungsaji vid pusad dist Yavatmal
NTS first exam     Mental ability Test
Mark 30     Time 1 hr

0 of 0 points

Name *

Piyush Wankhade

School Name *

Dinbai Vidyalaya

Share Edit Delete More

## सराव चाचणीतील अभिनंदन क्षण

काल झालेल्या NTS Test मध्ये Rank मध्ये आलेले विद्यार्थी 👇👇

**1st Rank**
**Charwak Jambhalunkar**
Jyotirgamay School , Pusad
**2nd Rank**
**Piyush Wankhede**
Dinbai Vid Digras
**3rd Rank**
**Shreya Dakhore** St. Mary School, Pusad

💐 **CONGRATULATIONS TO ALL**💐

10:09 AM ✓

## संदर्भ व परिशिष्टे

**NTSE प्रश्नापत्रिका - MSCE Pune**

**प्रज्ञा शोध परिक्षा _ प्रा अनंत वा वाईकर Edition 2021**

**Google**

**MPSC Notes**

**सहभागी विद्यार्थी**

| अनुक्रमांक | नाव | शाळेचे नाव |
|---|---|---|
| 1 | स्वप्नील भगवानराव ठाकरे | दिनबाई विद्यालय दिग्रस |
| 2 | चार्वाक भारत जांभरुणकर | ज्योतिर्गमय इंग्लिश मीडियम स्कूल पुसद |
| 3 | कुमारी स्नेहल संजय वानखेडे | ज्ञानप्रकाश विद्यालय सुकळी तालुका उमरखेड |
| 4 | अपूर्वा दिनेश बंड | नवजीवन ज्ञानपीठ इंग्लिश मीडियम स्कूल पुसद |
| 5 | शुभांगी मुकेश आडे | मोनाबाई गर्ल्स हायस्कूल दिग्रस |
| 6 | कोमल गजानन कोकणे | एस सि गर्ल्स गव्हर्मेंट रेसिडेंशियल स्कूल महागाव |

| | | |
|---|---|---|
| 7 | साक्षी पंजाबराव भोयर | कोषटवार दौलतखान विद्यालय पुसद |
| 8 | गौरी गजानन वानखेडे | ज्ञानप्रकाश विद्यालय सुकली तालुका उंबरखेड |
| 9 | सदिया मलाल | मोहना बाई विद्यालय दिग्रस |
| 10 | उत्कर्ष शिवराम बर्डे | श्रीराम आसेगावकर विद्यालय पुसद |
| 11 | प्राची गावंडे | मोहना बाई विद्यालय दिग्रस |
| 12 | निखिल अनिल ठाकूर | लोकहित विद्यालय पुसद |
| 13 | निशा दीपक गटावर | मोहनाबाई विद्यालय दिग्रस |
| 14 | वेदिका दिलीप राठोड | सेंट मेरी पुसद |
| 15 | दुर्गा खंडू खिरे | कस्तुरबा गांधी कन्या विद्यालय उमरखेड |
| 16 | श्रुती विनोद पदमवार | मोहना बाई विद्यालय दिग्रस |
| 17 | निलेश तांबडे | मातोश्री हायस्कूल महागाव |
| 18 | देवयानी भरार | मोहना बाई विद्यालय दिग्रस |
| 19 | साक्षी विनोद जाधव | मोना बाई विद्यालय दिग्रस |

| | | |
|---|---|---|
| 20 | भाग्यश्री रवी चव्हाण | मोहना बाई विद्यालय दिग्रस |
| 21 | मैथली प्रवीण तगडप ल्लेवार | ज्योतिर्गमय इंग्लिश मीडियम स्कूल पुसद |
| 22 | नेहा अनिल सुगंधी | एस सि गर्ल्स गव्हर्मेंट रेसिडेंशियल स्कूल महागाव |
| 23 | गौरी विनोद तिर्मारे | आर एफ मेहता स्कूल दिग्रस |
| 24 | अजिंक्य संतोष संघई | ज्योतिर्गमय इंग्लिश मीडियम स्कूल पुसद |
| 25 | रविराज सुधाकर इंगळे | दिनबाई विद्यालय दिग्रस |
| 26 | स्वाती अमृता सातपुते | महात्मा मुंगसाजी विद्यालय पुसद |
| 27 | करण राठोड | ज्ञानप्रकाश विद्यालय सुकळी तालुका उमरखेड |
| 28 | अनुराधा प्रवीण शिंदे | ज्ञानप्रकाश विद्यालय सुकळी तालुका उमरखेड |
| 29 | साक्षी काळे | श्रीमंत एन डी पांडे आदर्श हायस्कूल गुरव तालुका नांदगाव खंडेश्वर |
| 30 | प्रणव महाले | श्रीराम आसेगावकर विद्यालय पुसद |
| 31 | पियुष वानखेडे | दिनबाई विद्यालय दिग्रस |

| | | |
|---|---|---|
| 32 | सनम मोहम्मद अनिस शेख | विद्यानिकेतन स्कूल दिग्रस |
| 33 | गगन राठोड | ज्योतिर्गमय इंग्लिश मीडियम स्कूल पुसद |
| 34 | वैष्णवी वाघमारे | जेट्स किड्स पुसद |
| 35 | रोशन ज्ञानेश्वर मानतुटे | दिनबाई विद्यालय दिग्रस |
| 36 | आदित्य रघुनाथ डाखोरे | ज्योतिर्गमय इंग्लिश मीडियम स्कूल पुसद |
| 37 | कोमल संजय मनवर | मोहना बाई विद्यालय दिग्रस |
| 38 | यश चव्हाण | राष्ट्रीय विद्यालय दिग्रस |
| 39 | रिया प्रसाद देशपांडे | कोषटवार दौलतखान विद्यालय पुसद |
| 40 | जागृती सुभाष काटेकर | मोना बाई विद्यालय दिग्रस |
| 41 | खुशी जैस्वाल | मोहना बाई विद्यालय दिग्रस |
| 42 | संस्कृती संजय मुंडे | मोहना बाई विद्यालय दिग्रस |
| 43 | समृद्धी पेन्शन वार | संेट मेरी पुसद |
| 44 | श्रेया डाखोरे | संेट मेरी पुसद |
| 45 | वैभव पांडे | एम पी एन कॉन्व्हेंट पुसद |
| 46 | तेजल आवटे | मोना बाई विद्यालय दिग्रस |

| | | |
|---|---|---|
| 47 | समृद्धी पलीकोंडावार | मोहनाबाई विद्यालय दिग्रस |
| 48 | तन्मय दुर्गे | एम पी एन कॉन्व्हेंट पुसद |

Mission NTS

संबंधित यु ट्युब लींक ( मी स्वतः तयार केलेले )

https://youtu.be/cs8dBgHxQ_E

https://youtu.be/evvpocOWO6s

https://youtu.be/hCSon_caY44

https://youtu.be/VShgk3MT6rA

https://youtu.be/Ucc7Ho0Gkhg

https://youtu.be/t-sipSOL47I

https://youtu.be/NFk1aH0O3to

https://youtu.be/of_GMD44K7Q

इत्यादी

**वरील लिंक जे विद्यार्थी राष्ट्रीय प्रज्ञाशोध परीक्षेला बसतील त्यांच्यासाठी अतिशय उपयोगी आहेत**

**खालील दिलेल्या लिंक मी माझा उपक्रम राबवीत असताना प्रत्येक आठवड्याला ऑनलाइन चाचण्या घेतल्या त्याच्या आहेत हया लिंक च्या आधारे जे विद्यार्थी राष्ट्रीय प्रज्ञाशोध परीक्षेला बसतील त्यांना सराव म्हणून या लिंक्स वापरता येतील**

**Online Exam link ( माझे स्वतःचे )**

**https://docs.google.com/forms/d/1B2Ixf4T93eCJr25nDhgrbIi9wqG2D2nhuURyso3li6U/edit**

**https://docs.google.com/forms/d/e/1FAIpQLSee6bA3zuaR4LiNLip3HZzRd8_nsOizG-JxBh_OiPjki-qG2A/formResponse**

**https://docs.google.com/forms/d/e/1FAIpQLSc7Et4uU4P9J_frCFr6a0HqP6E057akfbeSvHxID_lSjmmWEQ/viewform**

**https://docs.google.com/forms/d/1c0mRC77QMBhKCSsBBV47IzFvyGW4vGdMAfimKFJVh6s/edit**

.

**https://docs.google.com/forms/d/1v2lYZ9wPcT1vWVZxIelUNfrq1BThDRYdQbBTjElL5qE/edit**

https://docs.google.com/forms/d/e/1FAIpQLSeKOs_NMLEAaQ9URmovavx1dlvJCEQw86USb-LpgBVVg5ac5w/viewform

https://docs.google.com/forms/d/e/1FAIpQLSdWIsTjscb72kvlmwqiT80aStF8ujV6-RE39gyXlj4Vb0v5uQ/viewform